**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 20.10.2025** **वार- सोमवार**

---

**दिवाळी**

दीपावलीच्या चैतन्य पर्वाचा उत्साह पुण्यात सर्वत्र दिसत असून अनेक ठिकाणी दीपोत्सव, दिवाळी पहाट यासारखे सांस्कृतिक सांगीतिक कार्यक्रम, आणि त्याचबरोबर वंचित गरजू कष्टकरी लोकांसाठी फराळ, कपडे वाटप यासारखे सामाजिक उपक्रम आयोजित केले जात आहेत. घरगुती आणि सार्वजनिक स्वरूपात दिवाळी फराळाचे कार्यक्रमही सुरू आहेत.
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने आज झालेल्या दिवाळी फराळ कार्यक्रमात जवळ जवळ 600 विद्यार्थ्यांनी फराळाचा आस्वाद घेतला. आपल्या घरापासून दूर राहणारे जे विद्यार्थी दिवाळीत घरी जावू शकत माहीत, त्यांना घराची आणि दिवाळीच्या आनंदाची उणीव भासू नये, या उद्देशाने विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ आणि विद्यार्थी वसतीगृहाने या दिवाळी फराळाचे आयोजन केलं होतं. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यावेळी उपस्थित होते.
दरम्यान दिवाळी सणाच्या काळात प्लास्टिकच्या वापरामुळे निर्माण होणारा पर्यावरणीय आणि आरोग्याचा धोका लक्षात घेऊन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाने हा सण जबाबदारीने साजरा करण्याचं  आवाहन नागरिकांना केलं आहे. ‘पर्यावरणपूरक दिवाळी, स्वच्छ शहराची दिवाळी’ हा संदेश देत महानगरपालिका विविध जनजागृतीपर उपक्रम राबवत आहे.

**आरोग्य संमेलन**

रुग्ण हक्क परिषद आणि पुणे महानगरपालिकेनं विविध संस्थांच्या सहकार्यानं पहिल्या आरोग्य साहित्य संमेलनाचं आयोजन पुण्यात केलं होतं. काल या संमेलनाचं उद्घाटन झालं. बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित या कार्यक्रमात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. स्मिता आणि डॉ. रवींद्र कोल्हे यांना पहिला ‘महाराष्ट्र आरोग्य भूषण पुरस्कार  प्रदान करण्यात आला. मेळघाटासारख्या अतिदुर्गम भागात काम करताना अनेक आव्हाने येतात. मात्र, तरीही

तिथल्या बालक, माता आणि अन्य रुग्णांना उपचार देण्यासाठी आम्ही दोघे काम करत आहोत. राज्यातल्या तरुणांनी पुढे येऊन ग्रामीण भागातल्या आरोग्य व्यवस्थेला सक्षम करावं असं प्रतिपादन डॉ. रवींद्र कोल्हे यांनी यावेळी केलं. यावेळी पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहायता निधीला एक लाख रुपयाचा धनादेश रामेश्वर नाईक यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला.

**<u>तीन भारतरत्न</u>**

भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या बुलंद स्वरांच्या आठवणी, गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या मधुर स्वरांच्या स्मृती आणि ज्येष्ठ राजनीतिज्ञ, कवी अटल बिहारी वाजपेयींची समर्थ शब्दकळा, यांचा त्रिवेणी संगम रसिकांनी काल सायंकाळी पुणेकरांनी अनुभवला. विद्यार्थी सहाय्यक समितीच्या फर्ग्युसन रस्त्यावरील संकुलातील मोडक सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मराठवाड्यातील पूरग्रस्त भागातील मुलामुलींसाठी सहाय्यता निधी उभारण्यासाठी या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<u>मेट्रो</u>**

लक्ष्मीपूजनानिमित्त पुणे मेट्रो प्रशासनाने मेट्रो सेवेत तात्पुरता बदल केला आहे. त्यानुसार उद्या मंगळवारी मेट्रो सेवा सकाळी सहा वाजता सुरू होऊन सायंकाळी सहा वाजेपर्यंतच सुरू राहणार आहे. त्यानंतर सायंकाळी सहा ते रात्री 11 या वेळेत मेट्रो सेवा बंद राहील. मात्र, बुधवारपासून  मेट्रोची सेवा नेहमीप्रमाणे सकाळी सहा ते रात्री 11 वाजेपर्यंत सुरू राहील, अशी माहिती मेट्रो प्रशासनाने दिली.

**<u>शिक्षक पदवीधर मतदार नोंदणी</u>**

पुणे विभागातील शिक्षक आणि पदवीधर मतदार संघातील मतदार नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून, खडकवासला विधानसभा मतदार संघातील पात्र शिक्षक आणि पदवीधर नागरिकांनी लोकशाही प्रक्रियेत सहभाग नोंदवण्यासाठी आपली नावे मतदार यादीत नोंदवावीत, असे आवाहन करण्यात आलं आहे.

**<u>सरसकट कर्जमाफी</u>**

अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी यासाठी आमदार रोहित पवार यांनी एक दिवसांच लाक्षणिक उपोषण सुरू केलं आहे. जगद्गुरू संत तुकोबांचं दर्शन घेऊन रोहित पवारांनी उपोषणाला सुरुवात केली.

**पुरस्कार**

भारतीय बालरोग शैक्षणिक संस्थेच्या, महाराष्ट्र शाखेच्यावतीने, देण्यात येणारा जीवनगौरव पुरस्कार पुण्यातील बालरोग तज्ज्ञ डॉक्टर शरद अगरखेडकर यांना नुकताच प्रदान करण्यात आला. अगरखेडकर यांच्या 27 वर्षांच्या बालरोग निदान, लस संशोधन आणि शैक्षणिक योगदानाच्या गौरवार्थ हा पुरस्कार देण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर मनोज झालटे यांच्या हस्ते हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.

**हॉकी**

महाराष्ट्र हॉकी संघटनेच्या वतीने नेहरूनगर इथल्या मेजर ध्यानचंद मैदानावर राज्यस्तरीय एम. जे. करंडक हॉकी स्पर्धा आज पार पडली. या स्पर्धेत मध्य रेल्वे संघाने अजिंक्यपद पटकावले. मध्य रेल्वे संघाने 4-2 अशा फरकाने बालेवाडी क्रीडा प्रबोधिनी संघाचा पराभव केला.

मुंबई ट्रेनिंग संघाने तिसरे स्थान राखले. मध्य रेल्वेचे सुंदर सिंग यांना सर्वोत्तम खेळाडू आणि जीवन शिंदे यांना सर्वोत्तम गोलरक्षक हा किताब देण्यात आला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 32 तर किमान तापमान 19 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या तापमान साधारण आजच्या प्रमाणेच असेल; तसंच दुपारनंतर हलक्या पावसाचाही अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**